<u>फौजदारी नगरपालिका अपील क्र.१/२०१६</u>
<u>निशाणी क्र.२० खालील आदेश</u>

**सुरेश दत्तात्रेय गांधी**
**विरुध्द**
**मुख्याधिकारी, महाड नगरपरिषद, महाड**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र.१ ते ३ यांनी वारस अभिलेखावर घेण्याकरिता झालेला विलंब माफ करण्यासाठी दिलेला आहे.

०२. अर्जदारांचे कथन की, त्यांचे वडील म्हणजेच प्रस्तुत प्रकरणातील अपिलार्थी सुरेश दत्तात्रेय गांधी हे दिनांक १५/०४/२०२० रोजी मयत झाले. अपिलार्थी सुरेश दत्तात्रेय गांधी यांना अर्जदार क्र.१ श्री. सजित सुरेश गांधी, अर्जदार क्र.२ सौ. स्मिता सुदेश जोशी व अर्जदार क्र.३ सौ. सुचिता शैलेश गुजर असे वारस आहेत. अर्जदारांनी निशाणी क्र.१८/१ कडे अपिलार्थी सुरेश दत्तात्रेय गांधी यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत हजर केली आहे.

०३. अर्जदारांचे पुढे कथन की, त्यांचे वडील मयत झाले त्यावेळी कोविड–१९ च्या प्रार्दुभावामुळे संपुर्ण देशभरात टाळेबंदी होती. त्यामुळे अर्जदार यांना सदर प्रकरणासंदर्भात त्यांच्या वकीलांशी भेट घेवून संपुर्ण माहिती घेणे शक्य झाले नाही. त्यामुळे अर्जदारांना वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. विलंब माफ न झाल्यास अर्जदारांचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. सामनेवाला म्हणजेच महाड नगरपरिषद यांना अर्जाची नोटीस (निशाणी क्र.२३) मुदतीत बजावणी झाली. त्यानंतर त्यांच्यातर्फे श्री. संदिप सर्कले वकीलांनी निशाणी क्र.२२ येथे पुरशीस दाखल केली व

नगरपरिषदेमार्फत वकीलपत्र दाखल करत असल्याचे नमुद केले. परंतु त्यानंतर त्यांनी आजतागायत वकीलपत्र दाखल केलेले नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात येतो.

०५. प्रस्तुतचा अर्ज महाराष्ट्र म्युनिसिपल ॲक्ट चे कलम १६९ (२)(बी) प्रमाणे कराचे मागणी बिल रद्दबातल करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वारस अभिलेखावर मुदतीत का घेण्यात आले नाही व त्यास विलंब का झाला या बाबतचे अर्जामध्ये दिलेले कारण हे संयुक्तिक दिसून येते. परिणामी मयत अपिलार्थीचे वारस अभिलेखावर आणण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायोचित ठरते असा निष्कर्ष नोंदवून मी खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. अर्ज (निशाणी क्र.२०) मंजूर करण्यात येतो.

२. मयत अपिलार्थीचे वारस अभिलेखावर आणण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

सही/-

**(एस. एस. पाटील)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, महाड

महाड
दिनांक – ०५/१२/२०२२